**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शनिवार दिनांक ०१ मार्च २०२५**

**ठळक बातम्या**

1. **२१ व्या शतकातील भारताकडे जग आशेनं पाहत असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे प्रतिपादन.**
2. **विधानपरिषदेत कॉंग्रेसच्या मुख्य प्रतोदपदी अभिजीत वंजारी यांची नियुक्ती.**
3. **भारताची खनिज संपदा अधिक समृद्ध करण्यात भारतीय खाण विभाग आणि जियोलॉजिकल सर्वे ऑफ इंडियाची महत्वाची भूमिका जीएसआयचे अतिरिक्त महासंचालक डी.व्ही. गणवीर यांच प्रतिपादन.**
4. **नागपूर महानगरपालिकेचा स्थापना दिवस उद्या, अमृत महोत्सवी वर्षात होणार मनपाचे पदार्पण.**

**---------------------------------**

**एन एक्स टी संमेलन**

**२१ व्या शतकातील भारताकडे जग आशेनं पाहत आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. ते आज नवी दिल्लीत भारत मंडपम इथं NXT परिषदेत बोलत होते. जगाच्या कानाकोपऱ्यातून लोक भारत समजून घेण्यासाठी इथं येत आहेत, असं प्रधानमंत्री म्हणाले. नुकत्याच झालेल्या महाकुंभ मेळ्याच्या व्यवस्थापनाची प्रधानमंत्र्यांनी प्रशंसा केली. साऱ्या जगाला याबद्दल भारताचं कौतुक वाटत असल्याचं त्यांनी सांगितलं. योग आणि आयुष उत्पादनं जागतिक पातळीवर पोहोचल्याबद्दल त्यांनी कौतुकोद्गार काढले. भारतात मोठ्या प्रमाणात उत्पादन होत असून निर्यात वाढल्याचं प्रधानमंत्र्यांनी नमूद केलं. भारतातल्या अनेक सेवा आणि वस्तू जगभरात जात आहेत असं प्रधानमंत्री म्हणाले....**

***आज भारत के मोबाइल, इलेक्ट्रॉनिक प्रोडक्ट्स भारत में बनी दवाइयां अपनी ग्लोबल पहचान बना रही हैं और इन सबके साथ ही एक और बात हुई है। भारत कई सारे ग्लोबल इनिशिएटिव्स को लीड कर रहा है।***

**---------------------------------**

**जन औषधी**

देशभरात आजपासून जन औषधी जन चेतना सप्ताहाला सुरुवात  झाली. केंद्रीय आरोग्य आणि कुटुंबकल्याण मंत्री जे. पी.नड्डा यांनी आज नवी दिल्लीत प्रधान मंत्री जनऔषधी योजनेच्या रथाला आणि इतर वाहनांना हिरवा झेंडा दाखवून रवाना केलं. येत्या ७ मार्च रोजी जन औषधी दिवस साजरा केला जाणार असून त्यानिमित्त या आठवड्यात विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. देशात जन औषधी केंद्र झपाट्यान वाढविण्यात येत असल्याचे आरोग्य  मंत्री जे पी नड्डा म्हणाले .......

*जन चेतना के माध्यम से जो 7 मार्च हम जन औषधि दिवस मना रहे हैं और महत्वाकांक्षी लक्ष्य ले करके प्रधानमंत्री जीके नेतृत्व में हम सब लोगों ने तय किया ह कि 2027 तक हम 25,000 केंद्र तक पहुँच जाएंगे तो एक लंबी यात्रा हम कर पा रहे हैं जहाँ हमने 80 केन्द्रों से शुरू किया था। आज हम15,000 केन्द्रों पर खड़े हैं, हम 20,000 इस साल के अंत तक कर लेंगे और 25,000 हम अगले साल तक कर लेंगे।*

नागरिकांना वद्द्यकीय सेवा पुरवणं हे केंद्र सरकारचं कर्तव्य आहे, तसंच सरकारच्या विविध योजनांचा लाभ सर्वांना मिळावा यासाठी नागरिकांनीही त्याबद्दल जागृती करावी, असं नड्डा यावेळी म्हणाले.

---------------------------------

प्रतोद

काँग्रेसचे विधानसभेतले मुख्य प्रतोद म्हणून आमदार अमित देशमुख यांची तर प्रतोद पदी शिरीषकुमार नाईक आणि संजय  मेश्राम यांची नियुक्ती करण्यात आली आहे. शिवसेनेचे उपनेते म्हणून अमीन पटेल तर सचिव म्हणून विश्वजित कदम यांची नियुक्ती झाली आहे. विधानपरिषदेचे गटनेते पदी सतेज पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मुख्य प्रतोदपदी नागपूरचे अभिजीत वंजारी तर प्रतोदपदी राजेश राठोड यांची नियुक्ती करण्यात आली आहे. काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या आदेशानं ही नियुक्ती झाल्याचं काँग्रेसने पत्रकाद्वारे सांगितलं.

---------------------------------

राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम

राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमाला आजपासून प्रारंभ झाला. उपमुख्यमंत्री अजित पवार आणि आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या उपस्थितीत पुण्यात या कार्यक्रमाचा मुख्य उद्घाटन सोहळा पार पडला. या अभियानांतर्गत शून्य ते १८

वयोगटातल्या मुलांची सर्वांगीण शारीरिक आरोग्य तपासणी, विनामूल्य शस्त्रक्रिया, करण्यात येणार आहे. या कार्यक्रमात ॲनिमिया मुक्त भारत अभियानांतर्गत भित्तीपत्रक आणि चित्रकथा पुस्तिकांचं प्रकाशनही मान्यवरांच्या हस्ते करण्यात आलं.

---------------------------------

'खनिज दिवस'

भारताची खनिज संपदा अधिक समृद्ध आणि तिला वाढविण्यात भारतीय खाण विभाग आणि जियोलॉजिकल सर्वे ऑफ इंडियाची महत्वाची भूमिका असून भारताची खनिज ऊर्जेची गरज ही इतर देशांवर अवलंबून न राहता स्वयंपूर्ण होईल अस प्रतिपादन जियोलॉजिकल सर्वे ऑफ इंडिया, मध्य विभाग नागपूरचे अतिरिक्त महासंचालक आणि विभाग प्रमुख डी.व्ही.गणवीर यांनी केले. भारतीय खाण मंत्रालयांतर्गत भारतीय खाण विभागातर्फे (इंडियन ब्युरो ऑफ माइन्स-आयबीएम) 1 मार्च 2025 रोजी आपल्या स्थापना दिनानिमित्त 78 वा खनिज दिन, इंडियन ब्युरो ऑफ माईन्स, सिवील लाईन्स नागपूर येथील मुख्यालयात आयोजित करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते.भारतीय खाण विभागामार्फत मायानिंग टेनेमेंट सिस्टम, मायनिंग सर्वेलन्स सिस्टीम सारखी डिजिटल सुधारणा राबविणारी प्रणाली भारतीय खाण विभागामार्फत विकसित केल्या गेली आहे. नागपुरात मॉइल, इंडियन ब्युरो ऑफ माईन्स, आणि जियोलॉजिकल सर्वे ऑफ इंडिया सारखी संस्था असून यांचा त्रिवेणी संगम तयार झाला असल्याची माहिती मिनरल एक्स्पोलेरेशन लिमिटेड- MECL नागपूरचे संचालक डॉ. इंद्रदेव नारायण यांनी दिली.राष्ट्रीय खनिज धोरण परिषदेच्या शिफारशींनुसार भारतीय खाण विभागाची स्थापना 1 मार्च 1948 रोजी करण्यात आली. सुरूवातीला पूर्णपणे सल्लागार संस्था म्हणून लहान प्रमाणात कार्यरत असलेला हा विभाग गेल्या काही वर्षांमध्ये देशाच्या खाण आणि खनिज उद्योगाच्या विविध पलूंवर काम करणारी एक प्रमुख राष्ट्रीय संस्था म्हणून उदयास आली आहे.

---------------------------------

नागपूर महानगरपालिका

नागपूर महानगरपालिकेचा 74 वा स्थापना दिवस रविवारी उद्या 2 मार्च रोजी साजरा करण्यात येणार आहे. नागपूर महानगरपालिका 74 वर्ष पूर्ण करुन 75व्या अमृत महोत्सवी वर्षात पदार्पण करीत आहे. मनपा स्थापनेच्या अमृत महोत्सवी सोहळ्याचे रविवारी 2 मार्च रोजी मनपा मुख्यालयामध्ये आयोजन

करण्यात आले आहे. नागपूरच्या नागरिकांच्या सेवेत 'पौर जन हिताय' हा ब्रीद वाक्य घेऊन अहोरात्री काम करणाऱ्या महापालिकेन महत्वाचा टप्पा आज गाठला आहे. मनपा मुख्यालयातील हिरवळीवर उद्या सकाळी 9.30 वाजता मनपा स्थापना दिवस कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.अभिजीत चौधरी हे राहतील. मुख्य अतिथी म्हणून अतिरिक्त आयुक्त आंचल गोयल, अतिरिक्त आयुक्त अजय चारठाणकर यांची उपस्थिती असेल. नागपूर महापालिकेची स्थापना 2 मार्च 1951 रोजी करण्यात आली होती. नागपूर महानगरपालिकेच्या इतिहासात आतापर्यंत 54 महापौरांनी महापालिकेला सेवा दिली तसच 51 आयुक्तांनी महापालिकेची प्रशासकीय धुरा सांभाळली.

---------------------------------

जाहनू बरुआ

आज चित्रपट असो वा कुठलेही शिक्षणक्षेत्र, तंत्रज्ञानाच्या प्रभावान सारे भारावले आहेत आणि परिणामी चित्रपटातील कलात्मकता हरवली. सर्जनशीलता समाजासाठी आवश्यक असते आणि समाजात घडणाऱ्या घटनांचे प्रतिबिंब चित्रपटातून उमटावे, अशी समाजात अपेक्षा असते. चित्रपटाच्या माध्यमातून समाजातील सामान्यांचा आवाज बुलंद व्हावा आणि तो राज्यकर्त्यांपर्यंत पोहचावा, हा चित्रपट निर्मिती मागचा मुख्य हेतू असल्याच प्रतिपादन बारा राष्ट्रीय पुरस्कार विजेते, पद्मभूषण जाहनू बरुआ यांनी येथे केले. महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ, सांस्कृतिक कार्य विभाग, पुणे फिल्म फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आणि मेराकी परफॉर्मिंग आर्टस ऑर्गनायझेनशच्या सहकार्यान आयोजित नागपूर एडीशन 23 वा पुणे इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हलमध्ये आज, शनिवारी आयोजित मास्टरक्लास दरम्यान प्रख्यात दिग्दर्शक आणि पिफ चे संचालक डॉ. जब्बार पटेल आणि पिफ चे क्रिएटिव्ह हेड आणि फिल्मगुरु समर नखाते यांनी जाहनू बरुआ यांच्याशी संवाद साधला.

---------------------------------

संगणक प्रशिक्षण बस

सामाजिक जबाबदारी अंतर्गत जिल्हातील ज्या मुलांकडे घरी संगणक सराव करण्यासाठी सोय नाही अशा गरजू विद्यार्थ्यांना मोफत संगणक प्रशिक्षण मिळाव तसच नागपूर जिल्हातील शाळाबाहय मुलांना शिक्षणाची आवड निर्माण

करून त्यांना जिल्हा परिषद शाळेत प्रवेश घेण्यासाठी मदत करून या मुलांना मुख्य प्रवाहात आणण्याच्या उद्देशान गरीब, गरजू आणि होतकरू अशा वंचित मुलांना संगणक शिक्षण सुविधांसह सुसज्ज बस मध्ये पूर्ण प्रवेश मिळावा आणि शाळा सोडलेल्या मुलांना शाळेत परत जाण्यासाठी प्रवृत्त करण्याच्या उद्देशान 'विंग्स फ्लाय हाय" या प्रकल्पाच्या अंतर्गत एलकेम साऊथ एशिया प्रायव्हेट लिमिटेड नागपूर आणि सह्याद्री फौंडेशन नागपूर यांच्या संयुक्त विद्यमान जिल्हा परिषद हायस्कूल नीलडोह तालुका हिंगणा जिल्हा नागपूर येथे संगणक प्रशिक्षण बसचे उद्घाटन डॉ कलाश, उपमुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नागपुर यांच्या हस्ते आणि सिद्धेश्वर कलूसे, शिक्षणधिकारी जिल्हा परिषद नागपुर यांच्या प्रमुख उपस्थिति मध्ये करण्यात आले.

-----------------------------------